# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
**Maharashtra Prathamik Shikshan Parishad**
(Govt. of Maharashtra Undertaking)

जा.क्र. मप्राशिप/सशिअ/संगणक/२०१७-१८/२५९५ दिनांक : - 3 NOV 2017

प्रति,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
२) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
३) विभागीय शिक्षण उप संचालक, मुंबई विभाग, मुंबई.

**विषय : सन २०१७-१८ या वर्षामध्ये राज्यातील सर्व शाळांची माहिती यु-डायस प्रणालीमधून संगणकीकृत करणेबाबत.**

**संदर्भ : भारत सरकार, मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे क्रमांक D.O. No. २३-९/२०१७-STATS दिनांक ३१/१०/२०१७ रोजीचे पत्र.**

दरवर्षी राज्यातील इयत्ता १ ली ते इयत्ता १२ वी पर्यंतची सर्व व्यवस्थापनाच्या शाळांची माहिती यु-डायस प्रणालीद्वारे ३० सप्टेंबर या संदर्भीय दिनांकानुसार संकलित करून संगणकीकृत करून अंतिम माहिती केंद्र शासन व न्युपा, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. याच माहितीनुसार वरती सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, ICT, IEDSS, Vocational Education, इ. केंद्र पुरस्कृत योजनांच्या वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकास भारत सरकारकडून मंजूरी देण्यात येते. तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ या कायद्याची अंमलबजावणी करण्याकरिता या माहितीचा उपयोग होतो.

सन २०१७-१८ या वर्षामध्ये राज्यातील सर्व शाळांची माहिती यु-डायस प्रणालीमार्फत संकलित करण्याकरिता भारत सरकार, न्युपा नवी दिल्ली, युनिसेफ यांच्या मदतीने कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेमध्ये भारत सरकारकडून सुधारित केलेले यु-डायसचे प्रपत्र प्राप्त झालेले आहे. त्या प्रपत्रानुसार यु-डायसची माहिती संकलितकरून संगणकीकृत करण्याकरिता भारत सरकारकडून सूचना देण्यात आलेला आहे. न्युपा नवी दिल्लीकडून माहिती संकलित करून अंतिम माहिती भारत सरकार व न्युपा नवी दिल्ली यांच्याकडून वेळापत्रक प्राप्त झालेले आहे.

➢ **यु-डायस सन २०१७-१८ ची माहिती वेळेत व अचूक प्राप्त होण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरावरून खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.**

१) <u>यु-डायसचे प्रपत्र भरण्याबाबतचे प्रशिक्षण व वितरण :-</u>

अ) **जिल्हा स्तर :** जिल्हा स्तरावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे उपस्थितीत जिल्ह्याचे संगणक प्रोग्रामर यांनी **दिनांक ०९ नोव्हेंबर, २०१७ ते दिनांक १३ नोव्हेंबर, २०१७** या कालावधीमध्ये जिल्ह्यातील सर्व शिक्षा अभियानाशी संबंधित सर्व अधिकारी तसेच सर्व गटातील गट शिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, साधन व्यक्ती, विषय साधन

व्यक्ती, MIS Co-ordinator, डाटा एन्ट्री ऑपरेटर-नि-सहाय्यक यांची एक दिवशीय बैठक आयोजित करून यु-डाईस प्रपत्र भरण्याबाबत प्रशिक्षण देवून सविस्तर मार्गदर्शन देण्यात यावे.

ब) **तालुकास्तर :** तालुका स्तरावरील MIS-Coodinator / Data Entry Opretor **यांनी** गटशिक्षणाधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये गटातील सर्व केंद्र प्रमुख व विस्तार अधिकारी यांची बैठक आयोजित करून यु-डायसचे प्रपत्र भरून सादर करण्याबाबतचे सूचना देण्यात यावे व सदर यु-डायस प्रपत्राबाबत केंद्र प्रमुखांना माहिती अचूक येण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन करून सर्व शकांचे निरासन करण्यात यावे, प्रपत्र वितरणाबाबत सूचना देण्यात यावे.

क) **केंद्र स्तर :** केंद्रप्रमुखांनी केंद्र स्तरावर आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व **दिनांक १० नोव्हेंबर, २०१७** ते **दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७**एक दिवशीय बैठक आयोजित करून बैठकीत यु-डायस प्रपत्र भरण्याबाबत मार्गदर्शन करावे. तसेच बैठक झाल्यानंतर आठ दिवसाच्या आत यु-डायस चे प्रपत्र स्वाक्षरीनिशी केंद्र कार्यालयामध्ये सादर करण्याबाबत सूचना देण्यात यावे.

२) **<u>यु-डाईस प्रपत्राची तपासणी, संकलन व संगणकीकरण</u> :**

अ) **शाळा स्तर :** शाळेच्या मुख्याध्यापकांनी यु-डायस सन २०१७-१८ चे प्रपत्र प्राप्त होवून अद्यावत शाळेची माहिती प्रपत्रामध्ये भरून मुख्याध्यापकाच्या स्वाक्षरी व शिक्याने प्रमाणीत करून सदरचे माहिती केंद्र कार्यालयामध्ये दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७ पर्यंत सादर करण्यात यावे.

ब) **केंद्र स्तर :** केंद्र प्रमुखांनी आपल्या केंद्रातील सर्व शाळाचे यु-डायसचे प्रपत्र प्राप्त करून घ्यावे. तसेच प्राप्त झालेले प्रपत्र मुख्याध्यापकांनी यांनी बरोबर भरलेले असल्याचे खात्री करून घ्यावी. त्यानंतर त्यांनी शाळास्तरावर जावून भरण्यात आलेले यु-डायसचे प्रपत्र १००% तपासून घ्यावे व प्रपत्रामध्ये चूकीची माहिती आढळल्यास त्या माहिती वरती लाल शाईच्या पेनाने वर्तुळ करून दुरूस्त माहितीची नोंद करून घ्यावी. सर्व शाळांचे प्रपत्र प्राप्त झाल्यानंतर सर्व प्रपत्र हे तालुका कार्यालयामध्ये संगणकीकरण करण्याकरिता दिनांक २५ नोव्हेंबर, २०१७ पर्यंत उपलब्ध करून देण्यात यावे.

क) **तालुकास्तर : गट शिक्षणाधिकारी यांनी** आपल्या तालुक्यातील सर्व केंद्र कार्यालयाकडून केंद्रातील सर्व शाळांचे यु-डायस प्रपत्र प्राप्त करून घ्यावे व प्राप्त झालेले प्रपत्र पूर्ण भरलेले असल्याचे खात्री करून घ्यावे व त्या प्रपत्रावर स्वाक्षरीकरून तालुका स्तरावरील MIS-Coodinator / Data Entry Opretor यांच्याकडे यु-डायस प्रणालीमध्ये माहितीत संगणकीकृत करण्याकरिता दिनांक ०५ डिसेंबर, २०१७ पर्यंत उपलब्ध करून दयावे.

संगणकिकृत झाल्यानंतर लगेच शाळेला School Report Card उपलब्ध करून देण्यात यावी. शाळेच्या मुख्याध्यापकांनी प्राप्त झालेल्या School Report Card मधिल माहिती तपासून घ्यावी. चूकीची आढळून आल्यास लगेच तालुक्यास्तवर जावून किंवा दूरध्वनीद्वारे माहितीमध्ये बदल करून घ्यावा व अंतिम School Report Card प्राप्त करून घ्यावी. सर्व शाळांची माहिती यु-डायस प्रणालीमध्ये संगणकीकृत झाल्यानंतर तालुकास्तर वरील अधिकाऱ्यानी यु-डायस प्रणालीमार्फत In-consistancy Module वापरून सर्व त्रृटी काढण्यात यावा व अंतिम माहिती प्रमाणीत करून जिल्हा कार्यालयास उपलब्ध करून देण्यात यावी.

ड) **जिल्हा स्तर :** जिल्हास्तरावरील संगणक प्रोग्रामर यांनी सन २०१७-१८ करीता यु-डायस प्रणालीमध्ये शाळांची माहिती जनरेट करून घ्यावी व सर्व तालुका कार्यालयांना डेटा एन्ट्री करण्याकरिता प्रणाली स्थापित करून देण्यात यावी. डेटा एन्ट्री पूर्ण झाल्यानंतर सर्व गटाकडून प्रमाणीत प्रमाण पत्रासह माहिती उपलब्ध करून यु-डायस प्रणालीमध्ये सर्व तालुक्यांची माहिती दिनांक १२ डिसेंबर, २०१७ पर्यंत एकत्रित करून, यु-डायस प्रणालीमार्फत जिल्हा स्तरावरती सर्व In-consistancy Module वापरून सर्व त्रृटी काढण्यात यावा व अंतिम माहिती प्रमाणीत करून राज्य कार्यालयास शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या स्वाक्षरीचे प्रमाण पत्राने DMP फाईल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई कार्यालयास उपलब्ध करून देण्यात यावी.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या स्वाक्षरीचे प्रमाण पत्र व DMP फाईल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर आपल्या जिल्ह्याची माहिती पुढील वर्षाचे वार्षिक नियोजन व अंदाज पत्रक करण्याकरिता अंतिम गृहित धरण्यात येईल.

३) यु-डायस प्रपत्र वितरण, आवश्यक मार्गदर्शन, संकलन व संगणकीकृत करण्याची जबाबदारी सर्व शिक्षा अभियानांतर्गत जिल्हा स्तरावर कार्यरत संगणक प्रोग्रामर यांचेकडे देण्यात यावी.

४) यु-डायस प्रपत्र शाळांना उपलब्ध करून देण्याकामी तसेच यु-डायस बैठकीसाठी येणारा खर्च जिल्हा कार्यालयाकरिता सन २०१७-१८ मध्ये व्यवस्थापनांतर्गत मंजूर असलेल्या लेखाशिर्षातून करण्यात यावा.

५) दिनांक १४ जुलै, २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार जिल्हा स्तरावरील संगणक प्रोग्रामर यांनी www.sdms.udise.in या संकेत स्थळावर जिल्ह्यातील नव्याने सुरू झालेल्या / मान्यता नसलेल्या शाळांची अथवा तुकड्यांची ऑनलाईन नोंदणी केलेली असल्याची खात्री करून घ्यावी व त्या सर्व शाळांना यु-डायस क्रमांक तात्काळ देण्यात यावे. जिल्ह्यामध्ये यु-डायस क्रमांक नसेल अशा शाळांना आपल्याकडून यु-डायस क्रमांक घेण्याकरिता सूचना देण्यात यावा, अन्यथा अशा शाळा विरुध्द

शासनाकडे कार्यवाहीकरिता प्रस्ताव सादर करण्यात येईल. जिल्हा स्तरावरती सन २०१७-१८ मध्ये संकलित करण्यात येणाऱ्या शाळांची यादींची मास्टर लिस्ट तयारकरून या कार्यालयात पाठविण्यात यावी.

६) जिल्हा स्तरावरील संगणक प्रोग्रामर यांनी सर्व शाळा ऑफलाईन यु-डायस प्रणालीमध्ये नोंदवून सन २०१७-१८ करिता सर्व तालुक्या निहाय शाळांची माहिती जनरेट करून घेण्यात यावी. जिल्हास्तरावरून सर्व शाळांना यु-डायसचे प्रपत्र प्रणालीमधून प्रिंट करून तालुका कार्यालयामार्फत सर्व शाळांना उपलब्ध करून देण्यात यावे. यु-डायसचे प्रपत्र हे शाळा तपशील ते शिक्षकांच्या माहिती पर्यंत प्रणाली मधूनच प्रिंट करून देणे आवश्यक आहे. जेणे करून मागील वर्षाची शाळेने दिलेली माहिती तपासणी करण्याकरिता उपलब्ध करून देण्यात येईल व माहिती अचूक प्राप्त होण्याकरिता मदत होईल. यु-डायस प्रपत्रामधील विद्यार्थ्यांच्या माहिती पासून ते शाळाच्या अतिरिक्त माहिती पर्यंतचे प्रपत्र झेरोक्स किंवा छायांकित प्रत देण्यात यावी.

जिल्हा / तालुका स्तरावर यु-डायस माहितीचे संगणकीकरण MIS Co-ordinator / डाटा एन्ट्री ऑपरेटर यांचेकडून करून घेण्यात यावे. ज्या तालुक्यात पद रिक्त असेल त्या ठिकाणी इतर तालुक्याचा डाटा एन्ट्री ऑपरेटर उपलब्ध करून द्यावा अथवा तालुका स्तरावर शालेय पोषण आहार योजनेंतर्गत कार्यरत असलेल्या डाटा एन्ट्री ऑपरेटर यांचेकडून माहिती संगणकीकृत करून घ्यावी. माध्यमिक शाळांची व कनिष्ठ महाविद्यालयातील माहिती भरून घेण्याकरिता त्या शाळा व महाविद्यालयातील लिपिकांची मदत घेण्यात यावी.

७) यु-डायस प्रणालीमध्ये माहिती संगणकीकृत करण्याकरिता जिल्ह्यातील अत्याधुनिक ICT / IT / CAL अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या संगणक प्रयोगशाळा उपलब्ध करून देण्यात याव्यात. जेणेकरून विहीत कालावधीत माहिती जिल्ह्यांना राज्य कार्यालयास सादर करणे शक्य होईल.

८) यु-डायस प्रणालीमध्ये जिल्ह्यातील केंद्र शासनाच्या, राज्य शासनाच्या अनुदानित शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, आदिवासी व समाज कल्याण विभागामार्फत कार्यान्वित असलेल्या, अल्पसंख्यांक विभागामार्फत कार्यान्वित असलेल्या, Cantonment Board, विना-अनुदानित शाळा, स्वयं अर्थसहाय्यित शाळा, CBSE, IB, ICSE, IGSE, मान्यता नसलेल्या किंवा अनधिकृत शाळा या सर्व शाळांच्या माहितीचा समावेश करण्यात यावा.

९) यु-डायस प्रणालीमध्ये जिल्ह्यातील सर्व शाळांची माहिती संकलित करून त्याचे संगणकीकरण करून घेण्याची जबाबदारी ही शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक / निरंतर), सर्व उप शिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख व त्या शाळेचे मुख्याध्यापक यांची राहील.

१०) जिल्हा संगणक प्रोग्रामर यांनी माहिती अंतिम झाल्यावर सर्व शाळांना School Report Card उपलब्ध करून द्यावे.

११) जिल्हा तसेच तालुका स्तरावर सर्व शिक्षा अभियानाशी संबंधित सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी आपल्या विभागाशी संबंधित यु-डायसमध्ये संगणकीकृत झालेली माहिती राज्य कार्यालयास सादर करण्यापूर्वी तुलनात्मकरित्या तपासावी व अंतिम माहितीच्या आधारे केंद्रपुरस्कृत योजनांचे वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक तयार करण्यात यावे.

१२) दिनांक २० जून, २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार विनाअनुदान कायम विनाअनुदान व स्वयंअर्थसहाय्यित शाळांच्या धोरणाबाबत स्पष्टीकरण करण्यात आलेले आहे. त्यानुसार कायम विना अनुदानित व्यवस्थापन असलेल्या शाळांना विनाअनुदानित शाळा यु-डायस प्रणालीमध्ये नमूद करण्याकरिता सूचना आहेत. त्याप्रमाणे यु-डायसचे प्रपत्रामध्ये शाळांचे व्यवस्थापन नमूद करण्याकरिता आपल्यास्तरावरून शाळांन सूचना देण्यात यावे.

उपरोक्त मुद्दयांनुसार यु-डायस २०१७-१८ चे संकलन, अद्यावतीकरण व वैधता ही सर्व प्रक्रिया पूर्ण करून सर्व जिल्ह्यांची DMP File दिनांक १५ डिसेंबर, २०१७ पर्यंत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई कार्यालयास सादर करावी. या कामास प्रथम प्राधान्य देण्यात यावे.

(नंद कुमार भा.प्र.से.)
राज्य प्रकल्प संचालक,
म.प्रा.शि.प., मुंबई.

प्रत,
मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव,

१) आयुक्त (शिक्षण), आयुक्त शिक्षण यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
३) संचालक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, मुंबई.
४) शिक्षण संचालक (प्राथमिक), प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनाल, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) आयुक्त, महानगरपालिका (सर्व).
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
८) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग.
९) प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सर्व जिल्हे,
१०) शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक / निरंतर), जिल्हा परिषद (सर्व).
११) शिक्षणाधिकारी / शिक्षण प्रमुख / प्रशासन अधिकारी, महानगरपालिका (सर्व.)